INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

# बचत गट– महिला उद्योजकतेचे एक साधन

प्रा. डॉ. वंदना एन. वैद्य
गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तुकूम, वंद्रपूर

प्रस्तावनाः

देशाचा विकास करायचा असेल तर ग्रामीन क्षेत्रापासूनच करावा लागेल आणि संपूर्ण भारताचा विकास करायचा असल्यास महिलांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. त्यांना आर्थीक दृष्टया पुढे आणण्यासाठी शासणाने अनेक योजना आखल्या आहे. भारतातील महिलांची अर्थीक क्षेत्रातील भूमीका अत्यंत महत्वाची आहे. बचत करणे महिलांचा स्थायी भाव आहे. स्वातंत्र प्राप्तीनंतर आपल्या देशात स्त्री शिक्षणावर विशेष भर देण्यात आला. त्यावर विचार करण्यासाठी अनेक समित्या तथा आयोग नेमण्यात आले. भारतीय घटनेने दिलेला समानतेचा हक्क हा महिलांच्या विकासाचा पाया आहे. विकसीत देशाचे स्वप्न साकारण्यासाठी स्त्री वर्गाचा विकास होणे आवश्यक झाले आहे. सतत वाढणारी महागाई नवनवीन समस्या यांना नष्ट करण्यासाठी स्त्रीयांनी आपल्या मधल्या गुणांचा कार्यक्षमतेचा विकास करून लघु उद्योग, कुटीर उद्योग, स्वयंमरोजगार केले तर कुटुंब, देश, यांचा विकास झालेला दिसून येईल. या सर्व गोष्टी साठी महिला आत्मांनिर्भर होणे गरजेचे आहे. त्यासाठी महिलांनी एकत्र येऊन सेघटीत होऊन लघुउद्योग स्वयंमरोजगार केल्यास त्यांच्या कुटंबाला आर्थिक हातभार लागेल. हळूहळू त्यांच्या कुटुंबाचा , गावचा तर पुढे जावून देशाचा विकास घडून येईल. आजच्या काळाकडे बघता प्रत्येक स्त्री ने लघुउद्योग किंवा स्वयंरोजगार करणे गरजेचे आह.

स्वयंमरोजगारावी उद्दीष्टेः

1. स्वयंमरोजगारामुळे महिला आर्थिक दृष्टया सबल होतात.
2. महिलांमध्ये नेतृत्व गुणांचा विकास होतो.
3. कुटुंबात समाजात प्रतिष्ठा मिळते.
4. सुप्त कलागुणांना वाव मिळतो.
5. आत्मविश्वास व निर्णयक्षमता वाढते.
6. सामाजीक संपर्क वाढतो.
7. महिला आर्थिकदृष्टया सबल झाल्याने त्या स्वतःच्या पायावर उभ्या राहतात.
8. आर्थीक स्वातंत्र वाढते.
9. व्यावहारीक ज्ञान मिळते.
10. सर्वांगीण विकास होण्यास मदत होते.

स्वयंमरोजगारासाठी पुढील गुण स्वयंरोजगार करणा–या महिलांकडे असणे गरजेचे आहे.

1.ध्येय निश्चिती 2.प्रामाणिकपणा
3.आत्मपरिक्षण 4.निण्रयक्षमता
5. कौशल्य 6.जबाबदारी 7.साहस
8.सहकाय्र 9. समन्वय

वरील सर्व गुण जर महिला उद्योजकते कडे असेल तरच ती उत्तम रोजगार उभारू शकेल.

स्वयंमरोजगाराची मार्गदर्शक तत्वे

1. व्यवसाय नोंदणी.
2. प्रशिक्षण.
3. निम्न व्यवस्था.
4. आवश्यक साधणयामुग्री.
5. प्रकल्प अहवाल.
6. लेखांकन.
7. व्ययनिर्धारण.
8. मालाचे पॅकींग.
9. मालाची विपनन व्यवस्था

महिलांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करण्यास बचत गटाची भुमीका

आर्थिक दृष्टया स्त्रीया सक्षम झाल्याशिवाय देशाचा विकास होऊ शकत नाही त्यामुळे हाच उद्येश समोर पुढे ठेऊन 1990 मध्ये बचत गटाची संकल्पना उदयास आली.

व्याख्या– महिलांची शक्ती वाढवण्याकरिता एकमेकांच्या सहकार्यातून तयार झालेला गट म्हणजे बचत गट किंवा स्वयंसाहाय्य गट.

स्वतःच्या मदतीसाठी स्वतः तयार केलेला गट म्हणजेबचत गट.

बचत गटाची स्थापनाः

गावातील विकास संस्था प्रमुख, बॅक कर्मचारी, ग्रमसेवक, शेतकरी इत्यादीच्या सहाय्याने बचत गटाची स्थापना केली जाते. या बचत गटात 10 ते 20 महिला ऐकत्र येवून दरमहा काही ठरावीक रक्कम बचत करतात. या महिला बचत गटातून अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचीव यांची नेमणूक करतात. राष्ट्रोयकृत किंवा सहकारी बॅकेत खाते उघडण्यात येते. गटाच्या सदस्या कडून आलेली

मासीक रक्कम बॅकेतील गटाच्या नावे असणा–या खात्यात जमा केली जाते.

बचत गटाव्दारे महिला खालील स्वयंरोजगार करू शकतात.:

1. झुणका भाकर केंद्र चालविणे.
2. शेवया, पापड लोणची तयार करणे.
3. मेणबत्या पणत्या तयार करणे.
4. लेदर रेक्झीन कापडी बॅग तयार करणे.
5. लोकरीच्या वस्तू तयार करून विकणे.

स्वयंरोजगाराचे महत्व–

ग्रामीण भागातील कमकुवत घटकातील महिलांना त्यांच्या स्वतःच्या पायावर उभे राहता येईल. त्या आत्मनिर्भर होतात एवढेच नाही तर त्यांचे संपूर्ण कुटुंब विकसीत करू शकते. त्यांचा जीवनस्तर उंचावतो. महिलांना आर्थिकदृष्टया स्वातंत्र मिळविण्याचे स्वयंरोजगार हे एक उत्तम साधन आहे.

संदर्भः

1. कौटुंबीक संसाधनाचे व्यवस्थापन – त्रिवेणा फरकाडे
2. गहव्यवस्थापन –डॉ. मुन्शी ,जठार
3. महिला कल्याण आणि विकास –प्रा.माध्वी कवी
4. उद्योजक मासीक
5. वृत्तपत्र

❖❖❖❖